नि.फौ.ख. क्र. ५५/२०२०

सरकार/जितेंद्र

नि.क्र. २६

**<u>सरकारतर्फे साक्षदार क्र. ६</u>**

माझे नाव : रायभान प्रभु दडेमल,

वय : ३६ वर्षे, धंदा : मजुरी,

राहणार : तिररी, ता.: पवनी, जि.: भंडारा.

**<u>सरतपासणी</u>**

(सरकारतर्फे सहायक अभियोक्ता आर.व्ही. रामटेके मॅडम)

घटना कोरोनाच्या अगोदर घडली होती. घटना किती वाजता व कशी घडली हे मला माहित नाही. मी दवाखान्यात गेलो होतो. मला फोन आला की, 'माझा चुलतसाळा गुरूदेव घोडमारेचा ॲक्सिडेंट झाला आहे'. त्यामुळे मी दवाखान्यात गेलो. तेथे तो मरण पावल्याचे मला दिसले. त्यानंतर पोलिसांनी काय केले हे मला माहित नाही.

**<u>साक्षदार अभियोग पक्षास सहायय करीत नसल्यामुळे अभियोग पक्षाने साक्षदाराची उलटतपासातील प्रश्नासारख्या स्वरूपाची प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता परवानगी देण्यात आली.</u>**

हे म्हणणे खरे नाही की, दि. ०९.०२.२०२० रोजी मी अपघाताचे घटनास्थळ चु-हाड फाटा येथे गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिसांना घटनास्थळ दाखविले होते. आता मला माझ्या बयाणातील अधोरेखांकित **भाग अ** वाचून दाखविला तो बरोबर नाही. पोलिसांनी माझ्या बयाणात असे का नमुद केले याचे कारण मला सांगता येणार नाही. मी आरोपीला ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपीतर्फे ॲड. आर. जी. काटेखाये यांनी नाकारले.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

दिनांक : २९.११.२०२३

स्वा/–

(एस.एन.पाटील)

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

**पवनी**